# महिलांचा राजकीय सहभाग

**डॉ.संगीता जी. भांगडिया (मालानी)**
नारायणराव राणा महाविद्यालय बडनेरा.

.................................................................................................................

महिलांच्या जागरुकता व आंदोलनासाठी एकोणिसावे शतक महत्त्वपूर्ण राहील. युरोप अमेरिका आशिया खंडात महिलांच्या अधिकारासाठी आंदोलने झाली. विसाव्या शतकात अमेरिकेत स्त्री मताधिकार साठी महिलांनी जो संघर्ष केला व **1919** ला अमेरिकेत महिलांना मताधिकार प्राप्त झाले. त्यानंतर स्त्रीवादी चळवळी ला नवीन दिशा मिळाली. **1927** मध्ये ब्रिटन मध्ये, **1944** ला फ्रान्समध्ये महिलांना मताधिकार मिळाले.भारतातही स्त्री मताधिकार साठी सरोजनी नायडू यांच्या नेतृत्वात तत्कालीन सचिव यांच्याकडे मागण्या मांडल्या त्यावेळी मद्रास राज्यात **1921** लाख स्त्रियांना मताधिकार देण्यात आले.

विसाव्या शतकात राष्ट्रीय आंदोलनात महिलांचाही उत्स्फूर्तपणे सहभाग होता. **1942** भारत छोडो आंदोलन, कायदेभंग चळवळ, असहकार आंदोलनात तन–मन–धनाने महिला सहभागी होत्या. राष्ट्रीय आंदोलना बरोबरच महिलांच्या अधिकारासाठी लढणाऱ्या सरोज देवी, सरोजनी नायडू, राजकुमारी अमृत कौर, कमलादेवी चटोपाध्याय, लेडी पिरोजबाई फिरोज शहा मेहता, श्रीमती सेनगुप्ता यासारख्या महिला अग्रणी होत्या. तसेच बंगालच्या सरलादेवी, ननी देवी, भगिनी निवेदिता, हुकडी बाला, कल्पना दत्त, कुमारी प्रीतीलता यासारख्या महिला क्रांतिकारी आंदोलनातही सहभागी होते. भारतीय राष्ट्रीय आंदोलनादरम्यान दलित स्त्रियांचाही संघर्ष महत्त्वपूर्ण आहे. महिलांची यौन शोषण विरोधी, सावकार–जमीनदार द्वारे होणारे अत्याचारविरोधी तेभांगा आंदोलन, टंका आंदोलन, तेलंगणा आंदोलनात झाडू, सराटा, मिरची पावडर सोबत घेऊन महिलांनीही पुरुषांच्या बरोबरीने आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. अशा आंदोलनात विमला मांझी, सत्यपाल वीरा, सिंधूवाला भुईया, ब्रिजबाला दोलुई यासारख्या महिलांनी पुढाकार घेतला होता. त्याच काळात दलित महिलांनी घरगुती हिंसाचार विरोधी आवाज उठवण्याची उदाहरण सापडतात. लेखिका रेणू चक्रवर्ती यांचा श्भारतीय महिला आंदोलन मे कम्युनिस्ट की भूमिका या लेखात त्यांनी लिहिले, की कम्युनिस्ट पक्षाने घरगुती हिंसाचार निषिद्ध असा प्रस्ताव पास केला त्याचबरोबर स्त्रीधन विषयही निर्णय घेतला.

अशाप्रकारे आपल्या हक्कासाठी लढणाऱ्या स्त्रियांचा सामाजिक व राजकीय इतिहास आहे. इतिहास हेच सांगतो आहे, की जेव्हा स्त्रियांवर अतोनात अत्याचार होतात तेव्हा स्त्रियांनी आंदोलने करून आपला अधिकार, अस्तित्व समाजाकडून मान्य करून घेतला आहे.

स्वातंर्त्यपूर्व काळातील चळवळी प्रमाणे विसाव्या शतकातील सहाव्या, सातव्या दशकात मोठ्या प्रमाणात आंदोलने झाली. शेतकरी, विद्यार्थी, दलित, गिरणी कामगार, आदिवासी स्त्रिया यांनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलने केली. या आंदोलनात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. **1974** जयप्रकाश नारायण यांनी सुरू केलेल्या श्संपूर्ण क्रांतिश चळवळीतही स्त्रियांही हिरीरीने सहभागी झाल्या होत्या. अनेक व्यक्तिगत, कौटुंबिक अडचणी, सामाजिक बंधने यावर मात करीत त्यांनी कार्य केले. स्त्रियांनी आपले अस्तित्व, आपल्यातील निर्णयक्षमता, नेतृत्वक्षमता जगापुढे सिद्ध केली होती. फ्रान्स, जर्मनी, वियतनाम, लॅटिन अमेरिका, अमेरिकेतील ब्लॅक पॅंथर आंदोलन, चीनमधील नव जनवादी क्रांती अशा अनेक चळवळीतून समाज व्यवस्थेत परिवर्तन दिसून येत होते.स्त्रियांचे प्रश्नो विश्वव्यापी आहे हे लक्षात आल्यावर संयुक्त राष्ट्रसंघाने **1975** हे महिला वर्ष व **8** मार्च महिला दिन म्हणून घोषित केले. तरीही आज आपण बघतो की अजूनही महिलांचे प्रश्न सुटलेले नाही. आजही कौटुंबिक अत्याचार, विनयभंग, बलात्कार, दलित महिलांवरील अत्याचाराच्या बातम्या रोज वाचतो, अजूनही समाजाची स्त्रीकडे बघण्याच्या दृष्टीकोन पूर्णतः बदललेला दिसत नाही, निश्चितच पूर्वीप्रमाणे स्त्रियांची स्थिती राहिली नाही परंतु दुर्दैवाने आजही तिच्याकडे एक स्त्री म्हणून न बघता एक व्यक्ती म्हणून बघण्याची मानसिकता विकसित झालेली नाही.

संविधानने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार दिले आहे. तरीही राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग फारसा समाधानकारक नाही. स्वातंर्त्यपूर्व व स्वातंर्त्योत्तर काळातील राजकीय चळवळीतील

महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता. मात्र नंतरच्या काळात महिला राजकारणात फारसा दिसल्या नाही. त्यांनी फक्त समाजकारण केले. त्यांनी असा समज करून घेतला, की राजकारणापेक्षा समाजकारण योग्य व श्रेष्ठ आहे. मात्र मागील पंचवीस तीस वर्षाचा विचार केल्यास असे दिसते की महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय आरक्षणानंतर स्त्रिया राजकारणात चांगल्याच रुळायला लागल्या आणि आपापल्या क्षेत्रातही चांगले काम केल्याची उदाहरणे आढळतात. **73** वी व **74** व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना राजकीय आरक्षण मिळाले. परंतु विधानसभा व लोकसभेत महिलांना आरक्षण देणारे विधेयक मात्र रखडत पडले आहे.

मतदान प्रक्रियेत महिलांचा सहभाग जवळपास पुरुषांच्या बरोबरीत आहे मात्र निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग हा समाधानकारक नाही. **2019** च्या लोकसभा निवडणुकीत **66-44%** महिला मतदात्या होत्या. परंतु संसदेत मात्र त्यांचा सहभाग केवळ **14** टक्के आहे.सामान्यपणे लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण कमी असते त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत निर्वाचित प्रतिनिधी पैकी **50** टक्के स्त्रिया असणे हे समतेच्या तत्त्वाला धरून आहे असे मांडणे तर्कसंगत आहे. परंतु प्रत्यक्षात स्त्रियांचे प्रतिनिधित्व **30%** च्या आसपास असले तरी ते समाधानकारक समजल्या जाते. आज जागतिक स्तरावर संसदेतील स्त्रियांच्या संख्येच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक **149** वा आहे.

मात्र भारतीय राजकारणात महिला मतदार म्हणून हा घटक अधिक महत्त्वपूर्ण आहे. अनेक मतदारसंघात हा घटक प्रभावी ठरला आहे. निवडणूक निकाल बदलण्याची क्षमता या घटकात आहे. त्यामुळे सर्वच पक्षाचे लक्ष या घटकाकडे असते. मात्र निवडणुकीत उमेदवारी देताना फारसा विचार केला जात नाही. प्रत्येक निवडणुकीत महिला मतदानाचा प्रमाण वाढलेला दिसतो. स्त्रियांचे मतदान व पुरुष मतदानाच्या टक्केवारीत फारसा फरक दिसत नाही. ते खालील सारणी वरून लक्षात येईल.

लोकसभा निवडणुकीत मतदान प्रक्रियेतील महिलांचा सहभाग

| निवडणूक | वर्ष | पुरुष % | महिला % | एकूण % | पुरुष व महिला मतदानातील अंतर | निवडणूक | वर्ष | पुरुष % | महिला % | एकूण % | पुरुष व महिला मतदानातील अंतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | 1952 | _ | _ | 61.2 | _ | दहावी | 1991 | 61.6 | 51.4 | 61.0 | 10.2 |
| दुसरी | 1957 | _ | _ | 62.2 | _ | अकरावी | 1996 | 62.1 | 53.4 | 57.9 | 8.7 |
| तिसरी | 1962 | 62.0 | 46.6 | 55.0 | 15.4 | बारावी | 1998 | 62.1 | 53.8 | 57.13 | 8.3 |
| चौथी | 1967 | 66.7 | 55.5 | 61.3 | 11.2 | तेरावी | 1999 | 64.0 | 55.6 | 60.4 | 8.4 |
| पाचवी | 1971 | 60.9 | 49.1 | 55.3 | 11.8 | 14वी | 2004 | 62.15 | 53.64 | 58.7 | 8.5 |
| सहावी | 1977 | 66.6 | 54.9 | 60.5 | 11.7 | पंधरावी | 2009 | 60 | 56.0 | _ | 4.0 |
| सातवी | 1980 | 62.2 | 51.2 | 56.9 | 11.0 | सोळावी | 2014 | 67 | 65.30 | 67.9 | 1.7 |
| आठवी | 1984 | 68.4 | 59.2 | 64.0 | 9.2 | सतरावी | 2019 | 67 | 66.44 | _ | 0.56 |
| नववी | 1989 | 66.1 | 56.9 | 62.0 | 9.2 | | | | | | |

वरील सारणी वरून स्पष्ट होते की महिला मतदानाचा प्रमाण प्रत्येक निवडणुकीत वाढत आहे. त्याचबरोबर पुरुष व महिला मतदानातील अंतरही कमी होत गेले आहे. पहिल्या व दुसऱ्या लोकसभा निवडणुकीची पुरुष व महिला मतदान असे स्वतंत्र नोंद झालेली नाही. तिसऱ्या लोकसभा निवडणुकीत (**1962**) मध्ये पुरुष व महिला मतदानातील अंतर हे **15-4** टक्के होते. पुरुष मतदानाचे प्रमाण अधिक होते परंतु **2019**ची **17** वी लोकसभा निवडणुकीत पुरुष व महिला मतदानाचे प्रमाण

मात्र जवळपास सारखेच आहे. तात्पर्य महिलांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढलेला आहे व पुरुष आणि महिला मतदानातील अंतर ही कमी झाले आहे.

**2019** च्या लोकसभा निवडणुकीत दमन दिव, बिहार, उत्तराखंड, झारखंड, मेघालय, अरुणाचल प्रदेश, लक्षदीप, दादर नगर हवेली, मणिपूर, गोवा, केरळ, पश्चिम बंगाल, ओरिसा, अंदमान निकोबार आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये महिला मतदानाचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक होते. पुरुषांच्या तुलनेत महिलांची निवडून येण्याची शाश्वती ही अधिक आहे. लोकसभा निवडणुकीत महिला उमेदवार म्हणून संख्या जरी कमी असली तरी निवडून येण्याचे प्रमाण मात्र पुरुषांपेक्षा अधिक आहे.**1952** च्या सार्वत्रिक निवडणुकीत **45** महिला उमेदवारांपैकी **22** महिला निवडून आल्या. त्यांच्या निवडून येण्याची प्रमाण **48-9%** होते. तर पुरुषांचे निवडून येण्याचे प्रमाण **32-0%** होते.**2009** च्या निवडणुकीत महिलांचे निवडून येण्याचे प्रमाण **13-2** टक्के होते तर पुरुषांचे **10-4** टक्के. **2019** च्या निवडणुकीतही महिलांचे निवडून येण्याचे प्रमाण **10-49** टक्के तर पुरुषांचे **6-37** टक्के होते. म्हणजेच महिलांनी कमी जागेवर निवडणूक लढविल्या नंतरही निवडून येण्याची शाश्वती पुरुषांपेक्षा अधिक दिसते.

एका शोधनिबंधाच्या आधारावर (महिला विधायक और आर्थिक विकास–सोनिया भलोत्रा) महिला आमदारांनी आपल्या विधानसभा क्षेत्रात केलेल्या कामामुळे अर्थव्यवस्थेत दरवर्षी **1-8** टक्के वृद्धि पुरुष आमदारा पेक्षा अधिक आहे.

युनायटेड नेशन यूनिवर्सिटी वर्ल्ड इन्स्टिट्यूट फॉर डेव्हलपमेंट एकोनोमिक्स रिसर्च शोधनिबंधात **1992** ते **2012** मधील **4256** राज्य विधानसभा चे अध्ययन केले. त्यानुसार असे समोर आले, की महिला प्रतिनिधी महिलांचे प्रश्न, बालकांचे प्रश्न, कौटुंबिक प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडतात. तसेच रस्त्या संबंधी काम पूर्ण करण्याच्या बाबतीतही अग्रणी दिसतात. महिला प्रतिनिधीने गावात पुरुष प्रतिनिधीच्या तुलनेत **22 %** काम पूर्ण केले आहे.

संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालानुसार निर्वाचित आरोपी प्रतिनिधीतमहिला प्रतिनिधींची संख्या पुरुष प्रतिनिधींच्या तुलनेत एक तृतीयांश आह

तात्पर्य **1**) मतदान प्रक्रियेत महिलांचा सहभाग हा पुरुषांच्या बरोबरीत आहे

२) पुरुष उमेदवाराच्या तुलना महिला उमेदवार निवडून येण्याची शाश्वती अधिक आहे.

३) पुरुष प्रतिनिधीच्या तुलनेत महिला प्रतिनिधी विकासात्मक कार्य अधिक करतात

४) पुरुष प्रतिनिधीच्या तुलनेत महिला प्रतिनिधी गुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे.

५)स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षणानंतर महिलांच्या अपेक्षा व महत्वकांक्षा वाढल्या आहे.

तेव्हा निर्णय प्रक्रियेतील ही त्यांचा सहभाग बरोबरीत असला पाहिजे ही मागणी काही गैर नाही. वास्तविक पहिला लोकसभेतील स्त्रियांच्या संख्येपेक्षा सतराव्या लोकसभेतील स्त्रियांची संख्या तिपटीपेक्षा जास्त आहे. परंतु ही समाधानकारक बाब नाही.हे खालील सारणी वरून स्पष्ट होईल.

लोकसभेतील महिलांचा सहभाग

| निवडणूक वर्ष | एकूण जागा | महिला सभासद | प्रमाण% | निवडणूक वर्ष | एकूण जागा | महिला सभासद | प्रमाण% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1952 | 489 | ,22 | 4.4 | 1991 | 529 | 36 | 7.0 |
| 1957 | 494 | 27 | 5.4 | 1996 | 541 | 40 | 7.4 |
| 1962 | 494 | 34 | 6.7 | 1998 | 545 | 44 | 8.0 |
| 1967 | 523 | 31 | 5.9 | 1999 | 543 | 48 | 8.8 |
| 1971 | 521 | 22 | 4.2 | 2004 | 543 | 45 | 8.1 |
| 1977 | 544 | 19 | 3.4 | 2009 | 543 | 59 | 10.9 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1980 | 544 | 28 | 5.1 | 2014 | 543 | 61 | 11.2 |
| 1984 | 544 | 44 | 8.1 | 2019 | 543 | 76 | 14.0 |
| 1989 | 529 | 28 | 5.3 | | | | |

वरील सारणी वरून असे दिसून येते, की महिला प्रतिनिधींची संख्या वाढत आहे.ही समाधानकारक बाब असली तरीही पुरुष प्रतिनिधींच्या तुलनेत ती संख्या फार कमी आहे.देशाची अर्धी असणारी जनता म्हणजे महिला यांचा कमीत कमी **30** टक्के सहभाग संसदेत असला पाहिजे .**1952** च्या निवडणुकीत **4-4** टक्के महिला प्रतिनिधी होत्या तर **2019** च्या निवडणुकीत की संख्या **14** टक्के पर्यंत येऊन पोहोचली. जागतिक स्तरावरील संसदेत तील महिला सहभागाच्या दृष्टीनेही भारतातील संसदेतील महिला सहभाग फार कमी आहे.

जागतिक स्तरावर विचार केल्यास असे दिसून येते, की रवांडा सारख्या आफ्रिकेतील गरीब देशात **30** टक्के जागा स्त्रियांसाठी राखीव आहे. शिवाय राजकीय पक्ष आपापली उमेदवार निवडताना महिलांसाठी जागा राखून ठेवतात. स्वीडन, फिनलांड, नार्वे यासारख्या देशात पक्ष स्त्रियांसाठी जागा आरक्षित ठेवतात. अर्जेंटिनात प्रत्येक राजकीय पक्षांनी आपापल्या यादीत **30** टक्के जागा स्त्रियांना दिल्या पाहिजे असा कायदा आहे. नेपाळ, फिलिपिन्स, युगांडा या देशात संविधानाद्वारे तर बेल्जियम, फ्रान्स, स्लोव्हेनिया अशा देशात कायद्याद्वारे स्त्रियांचा कोटा निश्चित करण्यात आला आहे.

भारतात सतराव्या लोकसभा निवडणुकीत बिजू जनता दल पक्षाचे ओडिसा मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी **33** टक्के स्त्रियांना उमेदवारी दिली. तर तृणमूल कॉंग्रेस पक्षाच्या प्रमुख व पश्चिम बंगाल मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी **40** टक्के जागांवर स्त्रियांना उमेदवारी दिले. हे भारतीय राजकारणात टाकलेले महत्त्वपूर्ण सकारात्मक पाऊल आहे. सर्वच पक्षांनी, सरकारनी या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे अन्यथा पुन्हा महिला आपल्या अधिकारासाठी आंदोलन करेल.

संदर्भसूची

**1**) स्त्री संघर्ष का इतिहास – राधा कुमार
**2**)नारी सशक्तिकरण का इतिहास– देवेन्द्र कुमार शरण
**3**)लोकशाही एक चिंतन– दिलीप सुरवाडे
**4**)Indian constitution and woman&Dr Nishant Singh
**5**)लोकसत्ता, चतुरंग **23** मार्च **2019**